# शेंडुरे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

हुपरी (वार्ताहार) : येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील होते. त्यानंतर डॉ. पाटील यांच्यासह माजी विद्यार्थी अमर कुलकर्णी, राजश्री काटकर, सुमित कांबळे, प्रदीप सुतार, अशोक चौगुले, धैर्यशील चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अजित पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सौ. शोभा संभोजी यांनी आभार व्यक्त केले. प्रा. सौ. तेजस्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. दैनिक पुढारी _ अमजद नदाफ

सकाळ

# विद्यालयाच्या जडणघडणीत माजी विद्यार्थ्यांचा मोठा वाटा

## डॉ. टी. एस. पाटील; शेंडुरे महाविद्यालयात स्नेहमेळावा

**हुपरी, ता. ७ : विद्यालयाच्या जडणघडणीत माजी विद्यार्थ्यांचा वाटा मोठा असतो. शिक्षण घेऊन बाहेर पडले तरी विद्यालयाशी असलेली नाळ तुटू देत नाहीत. अशा विद्यार्थ्यांमुळे विद्यालय लौकिकास पात्र ठरते. त्याचे प्रतीक म्हणजे चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालय होय, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी येथे केले.**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. पी. बी. पाटील होत्या.

ते म्हणाले, 'माजी विद्यार्थी हा महाविद्यालयाचा महत्त्वपूर्ण घटक असतो. नॅक पुनर्मूल्यांकनासाठी माजी विद्यार्थी खूप महत्त्वाचे असतात. महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. शेंडुरे महाविद्यालयासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. नॅक पुनर्मूल्यांकनासाठी २४ जुलैला उपस्थित राहावे.' प्राचार्या डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीविषयी माहिती दिली. मानसिंगराव देसाई, शिवराज नाईक, मुख्याध्यापिका नकाते, प्रदीप माकणे उपस्थित होते. माजी विद्यार्थी प्रा. विशाल कांबळे, अमर कुलकर्णी, राजश्री काटकर, सुमित कांबळे, प्रदीप सुतार, अशोक चौगुले, धैर्यशील चौगुले आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डी. सी. तुळशीकट्टी, प्रा. बी. ए. तराळ व डॉ. डी. आर. भोसले आदींनी नॅकविषयी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अजित पाटील यांनी केले. संयोजिका समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. शोभा संभोजी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी पाटील यांनी केले.




**हुपरी : चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना प्रा. डॉ. टी. एस. पाटील. शेजारी अजित पाटील, शिवराज नाईक, प्रा. पी. बी. पाटील आदी.**

Kolhapur, Ichalkaranji-Today
08/07/2019 Page No. 4